शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

राज्यशासनाच्या विविध विभागाच्या योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून डीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. सरहू पोर्टलमध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालय/संस्था/विद्यापीठ यांची माहिती www.mahadbtmahait.gov.in या लिंकद्वारे डीबीटी पोर्टलवर अद्ययावत करणे आवश्यक आहे.

याअनुषंगाने सर्व संलग्न महाविद्यालयांचे प्रोफाईल अद्ययावत करुन त्यास RO Login मधून विभागीय सहसंचालक यांनी तात्काळ Approval देण्याबाबत शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं-२०१८/ शिष्यवृत्ती/डीबीटी/१७११४ दिनांक. ०४/१०/२०१८ यांचे सोबतचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 148
दि. 12 OCT 2018

d:\mangutkar\circular.docx

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
## मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६११११५३


क्र.उशिसं-२०१८/शिष्यवृत्ती/डीबीटी /12114 दि. ०४.१०.२०१८

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

**विषय :- शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलद्वारे प्रभावी ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी त्यांचे प्रोफाईल तात्काळ अद्ययावत करणेबाबत ...**

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं-२०१८/शिष्यवृत्ती/डीबीटी/१६५२६, दि. १९.०९.२०१८

राज्यशासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून डीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. सदरहू पोर्टलमध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी त्यांचे महाविद्यालय/ संस्था/ विद्यापीठ यांची माहिती www.mahadbtmahait.gov.in या लिंकद्वारे डीबीटी पोर्टलवर अद्ययावत करणे आवश्यक आहे.

संदर्भिय पत्रान्वये दि. २५.०९.२०१८ पर्यंत आपल्या अधिनस्त असलेल्या अकृषि विद्यापीठे तसेच शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्रोफाईल अद्ययावत करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि अद्यापि आपल्या विभागातील अनेक महाविद्यालयांचे प्रोफाईल प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी याबाबत आपल्या विभागातील सर्व महाविद्यालयांचे प्रोफाईल अद्ययावत करुन त्यास RO Login मधून विभागीय सहसंचालक यांनी तात्काळ Approval देण्यात यावे.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रत :
१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
३. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित- टप्पाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये.


Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-2
Inward No. 20,280
Date 6-10-18